पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 12 वर्ष Year 2025 दिनांक Date 25/03/25

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. 1988 कलमे Sections 7
(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना Occurrence of offence शुक्रवार वार Day 21/03/25 तारीख पासून Date from 11:00 वेळ Time ........ तारीख पर्यंत Date to 24/03/25 वेळ Time 16.27 - चे दरम्यान

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 21/03/2025 वेळ Time 11:00 वा. सुमारास

(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 01 तारीख Date 25/03/2025 वेळ Time 04.30 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information लेखी लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. दक्षिणेस 4 कि. मी.

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name ........ ठिकाणाचे नंबर No. of ........ गल्ली ........ रस्त्याचे नाव Name of road ........
बृहन्मुंबई महानगर पालिका, बी/वार्ड,

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village डोंगरी पोस्ट मुंबई. तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाण्याचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name जगदिश ठाकूर (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name पांडुरंग ठाकूर

जन्म तारीख व वय Date of Birth and Age 59 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9869030260.

(e) पारपत्र क्रमांक Passport No. - दिल्याचा दिनांक Date of issue - दिल्याचे ठिकाण Place of Issue - (f) व्यवसाय Occupation हॉटेल मालक

(g) धर्म Religion हिंदू जात Caste आगरी जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address ........ गल्ली/वार्ड नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

रूम नं. ७, जनाबाई चाळ, २री सुनार गल्ली, डाकयार्ड पूर्व

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. माझगांव, राज्य State मुंबई 10. सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभिलेखा यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

1) डॉ. रेश्मा साबळे - वैद्यकिय आरोग्य अधिकारी - बृहन्मुंबई महानगर पालिका, बी वार्ड, डोंगरी मुंबई

2) गोविंद धावरे - कामगार - बृहन्मुंबई महानगर पालिका, बी वार्ड, डोंगरी मुंबई.

(G.C.P.) K 1043 (A) (1000-1-2025)

श्री. जगदिश पांडुरंग ठाकुर, वय ५१ वर्षे, धंदा- हॉटेल मालक, रा.ठी. रुम नं. ७, जनाबाई चाळ, २री सुनार गल्ली, डॉकयार्ड रोड, पुर्व माझगाव, मुंबई १० यांच्या स्वतंत्र पानावर टंकलिखीत केलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे.

ता

समक्ष

Jamdi

(नारायण खरोटे)
पोलीस निरीक्षक
भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग.
मुंबई.

ज.पां.ठाकुर.
(जगदिश पांडुरंग ठाकुर)

दिनांक:— २४/०३/२०२५

**जबाब**

मी जगदिश पांडुरंग ठाकूर वय ५९ वर्षे, व्यवसाय:—हॉटेल मालक, रा.डी. रू.नं.७, जनाबाई चाळ, २ री सुतार गल्ली, डॉकयार्ड रोड, पुर्व, माझगाव, मुंबई १०, मो.नं.९८६९०३०२६०, आधार कार्ड नं. ४००५४९३९०४२३

---

मी वरील प्रमाणे असून वर नमुद ठिकाणी माझी पत्नी व २ मुलांसह गेल्या १५ वर्षापासुन रहाण्यास आहे. माझे सुर्या रेस्टॉरंट (अन्नपुर्णा भोजनालय) नावाचे हॉटेल ११२, नंदलाल जानी रोड, दाणा बंदर, कुर्ला स्ट्रीट, पायधुनी, मुंबई ४००००९ या ठिकाणी आहे. मागील ८ वर्षापासुन मी ते चालवत आहे. सदर हॉटेलव्दारे मिळणाऱ्या उत्पन्नातून माझा व माझे कुटुंबियांचा उदरनिर्वाह चालतो. हॉटेलचे सर्व कागदपत्र माझे नावावर आहेत.

माझ्या हॉटेलचा मनपा येथील हेल्थ डिपार्टमेंट लायसन्स क्रमांक ८८७८९७९८५ असा आहे. सदर लायसन्सच्या वार्षिक नुतनीकरणाकरीता मी माहे जानेवारी २०२५ मध्ये बृहन्मुंबई महानगर पालिका, बी/वार्ड, डोंगरी, मुंबई येथे गेलो होतो. तेथे मला वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे यांना भेटण्यास सांगण्यात आले. त्याप्रमाणे मी वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे यांना भेटण्याकरीता गेलो असता तेथील कर्मचारी/श्रमीक श्री.गोविंद घावट यांनी सांगितले की, तुम्ही सदरकामाकरीता रू. ६०००/— मॅडमला दिले तर त्या तुमचे लायसन्स एनटीआर मधून काढतील त्यानंतर तुम्ही नुतनी करणाचे पैसे ऑनलाईन भरून तुमच्या हॉटेलचा हेल्थ परवाना नुतनीकरण करू शकाल.

त्यानंतर मी वेळोवळी डॉ. रेश्मा साबळे यांना जावून भेटलो असता त्यांनी सुध्दा परवाना नुतनीकरणाकरीता प्रथम रू.६०००/— द्या असे सांगितले. तेव्हा मी त्यांना विनंती केली की, माझे एनटीआर काढा मी माझे लायसन्सचे नुतनीकरण करतो. त्यानंतर मी तुमचे रू. ६०००/— देतो. त्यानंतर मी काही दिवस वाट पाहिली परंतु वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे यांनी माझी साईट ओपन केली नाही, म्हणून मी तेथील कार्यालयीन कर्मचारी श्री. गोविंद घावट यांना त्यांचा मो.क्र.७७४४८४५५०९ यावर संपर्क करून नुतनी करणाकरीता एनटीआर काढण्यासाठी मॅडमना विनंती करण्यास सांगत होतो परंतु डॉ. रेश्मा साबळे यांनी माझे हॉटेल परवना एनटीआर मधून काढला नाही.

मला मनपा, बी वार्डच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे यांना रुपये ६,०००/— इतक्या रक्कमेची लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २१/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथील कार्यालयात जावून तेथील वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्या ठिकाणी पो.नि. सरोदे व सपोआ निरज उबाळे यांना भेटुन मनपा, बी वार्डच्या वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे, तसेच कर्मचारी/श्रमीक श्री. गोविंद घावट हे परवाना नुतनीकरणाकरीता लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार दिली. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता तात्काळ दोन पंचांना बोलाविण्यात आले. पंचांची व पडताळणी पथकातील अधिकारी कर्मचारी यांची ओळख करून दिली.

मी दिलेल्या तक्रार अर्जावर लगेच पडताळणी कारवाई करणार असल्याचे पो.नि.सरोदे यांनी मला सांगितले. पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने लाप्रवि येथिल गोपनिय कक्ष येथे पो.नि. सरोदे, स.पो.आ. निरज उबाळे, मी व पंच गेलो. तेथे पंचासमक्ष सपोआ निरज उबाळे व पोनि नारायण सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल क्रमांक ९८६९०३०२६० वरून लाचेची मागणी करणाऱ्या लोकसेविका आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा साबळे यांचे मोबाईल क्रमांक ७५०६३४२२९९ वर व्हॉट्सॲपवर कॉल केला असता त्यांनी कॉल उचलून त्या ऑफिसला असून मला भेटायला यायला सांगितले. सदरचे संभाषण हे व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड करण्यात आले. लोकसेवक रेश्मा साबळे यांनी लाचेच्या रक्कम बाबत स्पष्ट सांगितले नसल्याने त्यांना त्यांचे कार्यालयामध्ये जावून भेटावयाचे ठरले.

समक्ष
[signature]
(नारायण सरोदे)
ला.प्र.वि. मुंबई

ज.पां.ठाकूर
(जगदिश पांडुरंग ठाकूर)



ACE Scanner

मी व पंच क्र. १ शिंदे असे लोकसेवक यांचे कार्यालयात गेलो असता लोकसेविका ह्या कार्यालयातून घरी जायला निघाल्या होत्या, परंतु मला पाहून त्या थांबल्या व पुन्हा त्यांच्या दालनात गेल्या. पंच क्र. १ दालनाच्या बाहेरच थांबल्या होत्या. मी लोकसेविका रेश्मा साबळे यांना किती देवू...याबाबत विचारले असता, त्यांनी लोकसेवक गोविंद यांनी किती सांगितले याबाबत माझेकडे विचारणा केली असता मी त्यांना सहा हजार बोलले होते असे सांगितले. त्यावर लोकसेविका यांनी दहा हा मग... असे बोलल्या. त्यानंतर लोकसेविका या घरी जायला निघाल्या असता मी त्यांना ठिक आहे सोमवारी दिले तर चालतील का? असे विचारले असता हा...हा... असा लोकसेविका रेश्मा साबळे यांनी रु. ६,०००/- लाचेच्या मागणीला होकार दिला. त्यानंतर आम्ही पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी परत जाऊन सदरबाबतची सर्व माहिती त्यांना दिली. मी व डॉ. रेश्मा साबळे आम्ही भेटल्यावर आमच्यामध्ये झालेले संभाषण व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झाले होते ते सपोआ उबाळे यांनी दोन पंचांचे समक्ष ऐकले त्यामध्ये रु. ६,०००/- मागणी केल्याचे रेकॉर्ड झाले असल्याचे व त्याच रक्कम घेवून सोमवारी डॉ. साबळे यांनी कामगार गोविंद यास भेटण्यासाठी सांगितल्याचे दिसून आले.

सपोआ निरज उबाळे व पो.नि. नारायण सरोदे यांनी सर्वांना सुचना दिल्या की, लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले असुन सापळा कारवाई ही लोकसेवक यांनी सांगितल्यानुसार करण्यात येईल तसेच पथकातील अंमलदारांना सतर्क राहण्याबाबत व गोपनियतेच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्व शासकिय वाहनाने लाप्रवि कार्यालयात परत आलो. आम्हा सर्वानुमते सोमवार दि. २४/०३/२०२५ रोजी पुन्हा सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक २४/०३/२०२५ रोजी मी पुन्हा लाप्रवि कार्यालयात सकाळी सुमारे ११.०० वा. हजर झालो. सुमारे १४:५० वा चे सुमारास पो.नि. नारायण सरोदे यांनी सापळा पथकास बोलावून योग्य त्या सुचना दिल्या. मी माझे वैयक्तिक बचतीतून आणलेली रक्कम रुपये ६,०००/- पो.नि.सरोदे यांचे समक्ष हजर केली. सदर चलनी नोटांच्या छायांकित प्रती कार्यालयातील झेरॉक्स मशीनव्दारे काढल्या. पंचांनी नोटांच्या छायांकित प्रतींवर स्वाक्षऱ्या केल्यानंतर पो.नि. सरोदे यांनी समक्ष म्हणुन स्वाक्षरी करुन सदरच्या छायांकित प्रती स्वत:च्या ताब्यात घेतल्या. त्यानंतर पो.नि. सरोदे यांचे सुचनेवरुन एक अंमलदार गोपनीय कक्षात आले. पो.नि. सरोदे यांनी त्यांची ओळख पो.ह.चा.३३९८६/फटांगरे अशी करुन दिली. त्यांनी पंचांना व मला अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. मी दिलेल्या नोटांवर त्यांनी कापसाच्या बोळ्याने नोटांच्या दोन्ही बाजूस अँन्थ्रासिन पावडर लावली व त्या नोटा माझे खिशात ठेवल्या. पो.नि. सरोदे यांनी आम्हा पंचाना सांगितले की, पडताळणी व सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची 'अंगझडती व लाचेची रक्कम' जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण करण्यात येणार आहे.

त्यानंतर दोन्ही पंच, मी, सपोआ उबाळे, पो.नि.सरोदे व सापळा पथक २ सरकारी वाहनांतून सुमारे १५.४० वा. लाप्रवि कार्यालयातून लोकसेवकाच्या कार्यालयात जाण्याकरीता रवाना झाले. जे. जे. मार्ग पोलीस स्टेशन येथे आल्यानंतर पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे नमुद दोन्ही वाहने कोणासही संशय येणार नाही अशा रितीने रस्त्याच्या बाजूला थांबविण्यात आले. सदर ठिकाणी पो.नि.सरोदे यांनी पडताळणी पथकास योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास, सापळा पथकास डोक्याच्या केसावर हात फिरवून लाच स्विकारल्याबाबत इशारा करावा असे मला सांगण्यात आले. त्यानंतर पो.नि. सरोदे यांच्या सुचनेप्रमाणे पो.ह. रवराणे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला अडकवून, कोणास दिसणार नाही अशा रितीने रेकॉर्डर चालु करून तो चालु असल्याची खात्री करून ठेवून दिला.

समक्ष,

( नारायण मारुती सरोदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

ज. पां. ठाकुर
(जगदिश पांडुरंग ठाकुर)

ACE Scanner

**श्री. जगदिश पांडुरंग ठाकूर वय ५९ वर्षे, यांचा दि. २४/०३/२०२५ रोजीचा जबाब पुढे सुरू...**

त्यानंतर मी व पंच क्र १ शिंदे असे लोकसेवक यांचे कार्यालयात जाण्यासाठी रवाना झालो. रूम नं. १४ आरोग्य विभाग येथे लोकसेवक घावट हजर होते. लोकसेवक घावट यांनी मला पाहताच ते माझ्या सोबत रूम नं. १४ च्या बाहेर आले. पंच शिंदे ह्या आमच्यापासून काही अंतरावर थांबल्या होत्या. त्यावेळी मी '' गोविंद भाई नमस्कार... किती फोन केले सकाळपासून... काय नाय काय... तेच मॅडमचं कामाच राहिलय द्यायच... तेच... सहा हजार सांगितलेलं... देवू ना...'' असे लोकसेवक घावट यांना बोललो त्यावर लोकसेवक घावट हे '' अरे... या... काय बोलता... अरे उगाच काय ती मला भनभन करायला लागली... तर म्हणलं ज... काय बोलता काय झाला... किती आहेत... म द्या माझ्याकडं..'' असे मला बोलले. त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवलेली अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ६,०००/– उजव्या हाताने काढून लोकसेवक गोविंद घावट यांच्यासमोर धरली असता लोकसेवक गोविंद घावट यांनी ती अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ६,०००/– त्यांच्या डाव्या हातात घेवून त्यांच्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर माझे विनंती वरून लोकसेवक घावट यांनी त्यांच्या मोबाईल फोन वरून लोकसेवक डॉ. रेश्मा सावळे यांच्या मोबाईल फोनवर फोन करून पैसे मिळाल्याचे सांगितले. मी सुध्दा पैसे गोविंद भाई यांच्याकडे दिल्याचे सांगितले त्यावर लोकसेविका डॉ. रेश्मा सावळे ह्या '' हा... आणि रिनीवल पण दिले का... मग रिनीवल पण द्या त्यांच्याकडे... हा... '' असे बोलून फोन कट केला. लगेच मी माझ्या डोक्यावरून हात फिरवून लोकसेवक गोविंद घावट यांनी लाच स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने लोकसेवक गोविंद घावट यांना लागलीच ताब्यात घेतले. तसेच लोकसेवक गोविंद घावट यांनी वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा सावळे यांच्याकरीता सदरची रक्कम घेतली असल्याने त्यांना सुध्दा महिला अंमलदारांकडून ताब्यात घेण्यात आले.

तरी लोकसेवक वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेश्मा हिरामन सावळे वय ४५ वर्षे व श्रमीक श्री. गोविंद गणपत घावट वय ४८ वर्षे यांनी माझे सुर्या रेस्टॉरंट (अन्नपुर्णा भोजनालय) या हॉटेलचा परवाना नुतनीकरण करण्याकरीता माझेकडे रुपये ६,०००/–इतक्या लाचेची मागणी केली. लोकसेवक श्री. गोविंद गणपत घावट यांनी सदरची लाचेची रक्कम माझेकडून स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझा वर नमुद जबाब संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( नारायण मारूती सरोदे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

ज. पां. ठाकूर
(जगदिश पांडुरंग ठाकूर)

ACE Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ................ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार जादा फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ................ 6,000/—

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

1. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ................

Unnatural / Accidental Death Case No., if any.

2. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

खालील नमूद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी लोकसेवक डॉ. रेखा दिगंबर साबळे वैद्यकीय अधिक्षक अधिकारी व श्री. गोविंद गजानन घावट नायक यांनी फिर्यादी यांच्या हॉस्पिटलचे व डिपार्टमेंट नावसल्याच्या आर्थिक नुतनी करण्याकरिता रु. ६,०००/- इतक्या लाचेची मागणी करून आलेले महिला डॉ. रेखा साबळे यांचे आशावरून आलोसे गोविंद घावट यांनी सदरची लाच रक्कम स्विकारली आहे म्हणून गु.र.क्र. ९२/२०२५ कलम ७ भ्र.प्र. अधि १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

1. **केलेली कार्यवाही** - 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ................ पो. नि. नारायण सरोदे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................ जिल्हा ................ राज्य ................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ................

Transferred to P. S. ................

District ................ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant/Informant

ज. पां. ठाकूर

(जगदिश पांडुरंग ठाकूर)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ................ नारायण मारूती सरोदे

पदनाम Rank ................ पोलीस निरीक्षक.

तपासिक अ. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,

Posting

Code No. of I. O. ................

1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ................ 25/03/2025

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

ACE Scanner